☎ : 07172-264300
📠: 07172-255800
Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in
✍: 7276494810 (PRO)

## चंद्रपूर पोलीसांची अवैध दारूविक्री करणाऱ्यांवर कार्यवाही

जिल्हयात दारूबंदी घोषीत झाल्यापासुन अवैध दारू तस्करी आणि विक्री करणाऱ्यांवर चंद्रपूर जिल्हा पोलीस प्रभावी कार्यवाही करण्यासाठी अहोरात्र परिश्रम घेत आहे. यादरम्यान दिनांक ०५/०२/२०१९ रोजी जिल्हयातील विविध पोलीस स्टेशन अंतर्गत नाकेबंदी आणि छापे टाकुन अवैध दारूचा साठा जप्त करण्यात पोलीसांना यश प्राप्त झाले आहे.

यामध्ये जिल्हयातील पोलीस स्टेशन **चंद्रपुर शहर, बल्लारशाह, घुग्घुस, वरोरा, भद्रावती, माजरी, चिमुर, ब्रम्हपुरी, तळोधी, सिंदेवाही, पोंभुर्णा, राजुरा, धाबा, गोंडपिंपरी, गडचांदुर, कोरपना** अंतर्गत संबधीत पोलीस पथकाने प्रभावी कार्यवाही करीत दारू तस्करी आणि विक्री करणाऱ्याच्या विरूध्द जिल्हयात एकुण **२३** गुन्हयाची नोंद करण्यात आली असुन १३ आरोपीस अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हयात एकुण **१,४४,६००/—रू.** चा मुददेमाल हस्तगत करण्यात आला आहे. पुढिल तपास संबंधीत पोलीस स्टेशन करीत आहे.

---

## चंद्रपर पोलीसांची जुगार खेळणाऱ्यांवर कार्यवाही

### १)पोलीस स्टेशन गडचांदुर :—

दिनांक **०५/०२/२०१९** रोजी पोलीस स्टेशन **गडचांदुर** अंतर्गत ०१ आरोपी ईसम हा सट्टापट्टीच्या आकडयावर पैशाची बाजी लावुन हारजीतचा जुगाराचा खेळ खेळताना मिळुन आल्याने पो.स्टे. **गडचांदुर** येथे अप. क्र. **४६/२०१९** कलम १२ (अ) मुंबई जुगार कायदा अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्हयातील ०१ आरोपीस अटक करण्यात आले असुन घटनास्थळावरून जुगारच्या साहीत्यसह नगदी असा एकुण **२,८०५/—रू.** चा माल हस्तगत करण्यात आला आहे. पुढील तपास **गडचांदुर** पोलीस करीत आहे.

---

### २)पोलीस स्टेशन गडचांदुर :—

दिनांक **०५/०२/२०१९** रोजी पोलीस स्टेशन **गडचांदुर** अंतर्गत ०१ आरोपी ईसम हा सट्टापट्टीच्या आकडयावर पैशाची बाजी लावुन हारजीतचा जुगाराचा खेळ खेळताना मिळुन आल्याने पो.स्टे. **गडचांदुर** येथे अप. क्र. **४७/२०१९** कलम १२ (अ) मुंबई जुगार कायदा अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्हयात घटनास्थळावरून जुगारच्या साहीत्यसह नगदी असा एकुण **३,०२०/—रू.** चा माल हस्तगत करण्यात आला आहे. पुढील तपास **गडचांदुर** पोलीस करीत आहे.

---

☎ : 07172-264300
: 07172-255800
Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in
: 7276494810 (PRO)

# भिसी येथे घरात अवैधरित्या दारू बाळगणाऱ्या

## आरोपीस ०३ वर्ष कारावास आणि २५ हजार रू. दंडाची शिक्षा

पोलीस स्टेशन भिसी अंतर्गत विक्री करीता घरात अवैध दारू बाळगणाऱ्या आरोपीस ०५/०२/२०१९ रोजी **श्री. छल्लानी, जेएमएफसी कोर्ट चिमुर, जि. चंद्रपुर यांनी** शिक्षा ठोठावली.

पोलीस स्टेशन भिसी अंतर्गत **आरोपी नामे १) गोकुळदास विश्वनाथ गेजीक वय ४०, २) ललीतसिंग बावरी वय २५ रा. पवणी यांनी** चंद्रपुर जिल्हयात दारूबंदी असुन सुध्दा अवैध रित्या मौजा अमरपुरी भान्सुली येथे घरात विक्री करीता दारू ठेवलेली होती. पोलीसांनी गोपनीय माहितीवरून घराची झडती घेतली असता २८८ नग देशी दारूच्या बॉटल मिळुन आल्या. यावरून आरोपींविरूध्द पोलीस स्टेशन भिसी येथे अप.क्र. २३०/२०१६ कलम ६५ ई ८३ म.दा.का. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्ह्याचा तपास पोहवा. सोरते यांनी पुर्ण करून गुन्हयातील आरोपींविरूद्ध सबळ पुराव्यानिशी न्यायालयात दोषारोपपत्र सादर केले.

न्यायालयाचे सुनावणी दरम्यान सदर प्रकरणात साक्षीदार तपासले व योग्य पुराव्याच्या आधारे दिनांक ०५/०२/२०१९ रोजी यातील **आरोपी नामे गोकुळदास विश्वनाथ गेजीक वय ४० यास ०३ वर्ष सश्रम कारावासीची शिक्षा व २५,०००/—रू दंड, दंड न भरल्यास ६ महिने सश्रम कारावासाची शिक्षा श्री. छल्लानी, जेएमएफसी कोर्ट चिमुर, जि. चंद्रपुर यांनी** ठोठावली आहे. सदर प्रकरणामध्ये सरकार तर्फे **ॲड. श्री. संजय ठावरी, सरकारी अभियोक्ता, चंद्रपूर** आणि कोर्ट पैरवी म्हणुन सफौ. सुधाकर बुटके पोस्टे चिमुर यांनी काम पाहिले.

---

चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र
कार्यालय पोलीस अधीक्षक, चंद्रपूर
Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in
०६ फेब्रुवारी, २०१९
☎ : 07172-264300
: 07172-255800
✍: 7276494810 (PRO)

# स्थानिक गुन्हे शाखेची धडक कार्यवाही

## ९ लक्ष २५ हजाराचा दारुचा मुद्देमाल हस्तगत

दिनांक ६ फेब्रूवारी, २०१९ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक वरोरा पोलीस स्टेशन परिसरात पेट्रोलींग करीत असतांना गोपनिय माहिती मिळाली की, विनोद मत्ते याने मौजा चिनोरा येथील जिल्हा परिषद शाळेच्या पाठीमागे एका बंद पडलेल्या घरातील टॉकी मध्ये देशी–विदेशी दारु उतरवून साठवुन ठेवली आहे. अशा माहितीवरून पोलीस पथकाने त्या ठिकाणी छापा मारला असता त्या ठिकाणी हजर असलेल्या इसमापैकी एक इसम नामे **अजय सुधाकर दानव** मिळुन आला. सदर इसमास ताब्यात घेवुन सदर जागेची झडती घेतली असता टॉकी मध्ये देशी दारु रॉकेट संत्रा कंपनीच्या ७० पेटया किंमत ७,००,०००/–, ६ पेटया मध्ये ऑफीसर चाईस कंपनीची विदेशी दारु किंमत ८६,४००/– , ४ पेटया ऑफीसर चाईस ब्ल्यु कंपनीची विदेशी दारु किंमत ५७,६००/–, दोन मोपेड गाडया किंमत ८०,०००/– व एक मोबाईल किं. १०००/– असा एकुण ९ लक्ष २५ हजार रुपयाचा मुद्देमाल मिळुन आला आहे. सदरचा गुन्हा पोलीस स्टेशन वरोरा येथे अपराध क्रमांक १३१/२०१९ कलम ६५ (ई), ८३ मदाका सहकलम १८८ भादंवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्हयातील **आरोपी नामे अजय सुधाकर दानव, वय १९ वर्ष रा. कॉलरी वार्ड, वरोरा** यास अटक करण्यात आली असुन फरार असलेल्या आरोपीचा तपास सुरू आहे.

सदरची कार्यवाही पोलीस अधीक्षक डॉ. महेश्वर रेड्डी यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरिक्षक श्री. ओमप्रकाश कोकाटे, पोलीस उपनिरीक्षक श्री शंकर मुटेकर, पोशि, विनोद जाधव, पोशि प्रफुल्ल मेश्राम यांनी केली आहे.

---

☎ : 07172-264300
: 07172-255800
Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in
: 7276494810 (PRO)

# गडचांदुर पोलीसांची दारू तस्करीवर कार्यवाही

## एका आरोपीसह १३ लक्ष ४२ हजाराचा मुद्देमाल हस्तगत

दिनांक ६ फेब्रूवारी, २०१९ रोजी पोलीस स्टेशन गडचांदुर येथील पोलीस पथकास गोपनीय माहिती मिळाली की, काही इसम मौजा विरूर गाडेगाव मार्गे गडचांदुर कडे एका चारचाकी वाहनाने दारूची तस्करी करणार आहे. अशा माहितीवरून पोलीस पथकाने तात्काळ मौजा गाडेगाव येथे नाकेबंदी लावुन वाहनाची तपासणीस सुरवात केली असता मिळालेल्या माहितीप्रमाणे समोरून एक टाटा सफारी चारचाकी वाहन येतांना दिसले. संशयावरून सदर वाहनास थांबविण्याचा इशारा केला असता वाहन थोडया दुरवरच थांबवुन वाहनातील इसमांनी पोलीसांना पाहुन पळ काढला. पोलीस पथकाने सदर वाहनाच्या जवळ जावुन चालकास ताब्यात घेवुन विचारपुस केली असता सदर वाहनात मोठया प्रमाणात अवैध दारूचा साठा मिळुन आला. सदर वाहनचालक **आरोपी नामे नरेश विठ्ठल बावणे वय २१ रा. खिर्डी ता. कोरपना जि. चंद्रपुर** यास अटक करून मालाची पाहणी केली असता वाहनामध्ये देशी दारूच्या ३५५२ निपा किं. ५,३२,८००/—रू, एक टाटा सफारी वाहन क्र. एचआर २६ एके ०६१२ किं. ८,००,०००/—रू, एक मोबाईल फोन किं. १०,०००/—रू असा **एकुण १३,४२,८००/—रू** चा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला असुन सदरचा गुन्हा पोलीस स्टेशन गडचांदुर येथे नोंद करण्यात आला आहे. यातील फरार आरोपींचा शोध सुरू असुन पुढिल तपास गडचांदुर पोलीस करीत आहे.

सदरची कार्यवाही पोलीस अधीक्षक डॉ. महेश्वर रेड्डी यांचे मार्गदर्शनाखाली श्री. विलास यामावार, उपविभागीय पोलीस अधिकारी गडचांदुर आणि पोलीस निरिक्षक श्री. पवार यांचे नेतृत्वात पोलीस उपनिरिक्षक श्री. घोडके यांचे सह गडचांदुर पोलीस पथकाने पार पाडली.

---